शासन ज्ञापन, गृह विभाग, क्र. दुरूस्ती-०२१७/ प्र.क्र.१०३/ पोल-७, दिनांक २७.०३.२०१७, रद्द करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग

शासन निर्णय क्र. दुरूस्ती-०२१७/प्र.क्र.१०३/पोल-७.
मंत्रालय, दुसरा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०००३२.
दिनांक ४ मे २०१९.

वाचा :-
१) पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, यांच्या कार्यालयाचे पत्र क्र. पोआ./ कक्ष-८(१२)/ २३९२/ २०१७, दिनांक १६.०३.२०१७.
२) शासन ज्ञापन, गृह विभाग, क्र. दुरूस्ती-०२१७/ प्र.क्र.१०३/ पोल-७, दिनांक २७.०३.२०१७.
३) शासन निर्णय, गृह विभाग, क्र. पोप्रमा-०११७/ प्र.क्र.८०/ पोल-७, दिनांक ३१.०३.२०१७.
४) पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, यांच्या कार्यालयाचे पत्र क्र. पोआ./ कक्ष-८(१२)/ शा.१३४/ २०१७, दिनांक १७.०४.२०१७.

प्रस्तावना.

सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई, येथील पोलीस निवासी इमारत क्र.ए-१ याच्या दुरूस्तीची विवक्षित कामे करण्यासाठी शासन ज्ञापन, गृह विभाग, क्र. दुरूस्ती-०२१७/ प्र.क्र.१०३/ पोल-७, दिनांक २७.०३.२०१७, द्वारे रु.२,१५.७६,५८१/- इतक्या खर्चाच्या अंदाजास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली होती. तसेच, शासन निर्णय, गृह विभाग, क्र.पोप्रमा-०११७/ प्र.क्र.८०/ पोल-७, दिनांक ३१.०३.२०१७, द्वारे उक्त कामासाठी रु.१,६२,९८,२३१/- इतका निधी वितरित करण्यात आला होता.

२. तथापि, सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई, येथील इमारत क्र. ए/१, बी/१/१, बी/१/२, सी/१/१, सी/१/२, सी/१/३, सी/२/१, सी/२/२ व सी/२/३ या नऊ इमारतींचा पुनर्विकास करण्याबाबत पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, यांनी म.रा. पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्या., यांच्याकडे प्रस्ताव पाठविला आहे. त्यामुळे शासन ज्ञापन, गृह विभाग, क्र. दुरूस्ती-०२१७/ प्र.क्र.१०३/ पोल-७, दिनांक २७.०३.२०१७, द्वारे प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली दुरूस्तीची कामे करण्याची आवश्यकता नाही. म्हणून शासनाने पुढील निर्णय घेतला आहे.

<u>शासन निर्णय</u>.

शासन ज्ञापन, गृह विभाग, क्र. दुरूस्ती-०२१७/ प्र.क्र.१०३/ पोल-७, दिनांक २७.०३.२०१७, हे याद्वारे, रद्द करण्यात येत आहेत.

२. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०५०४१५५९०८४५२९ असा आहे. हा शासन निर्णय डीजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SWAPNIL GOPAL BORSE

Digitally signed by SWAPNIL GOPAL BORSE
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=c6a6e7cad855fc787a96e36f11fbc87a9f66cfd9bad01184493f2735ad885627, postalCode=400032, street=2ND FLOOR,MANTRALAYA,MADAME CAMA MARG,MUMBAI, serialNumber=8538cd1e408948f7d025537d5f6589bd8958d1b95322e66d2cc5edf89ad0d79e, ou=HOME DEPT, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=SWAPNIL GOPAL BORSE
Date: 2019.05.04 16:05:12 +05'30'

(स्वप्नील गोपाल बोरसे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रति,
पोलीस आयुक्त,
बृहन्मुंबई.

प्रत-

१) व्यवस्थापकीय संचालक, म.रा. पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्या., मुंबई.
२) अधीक्षक अभियंता, सा.बां. मंडल, मुंबई.
३) कार्यकारी अभियंता, मध्य मुंबई (सा.बां.) विभाग, वरळी, मुंबई.
४) कार्यासन अधिकारी (व्यय-७/ विनियम), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
५) कार्यासन अधिकारी (इमा.-२), सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई.
६) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
७) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
८) प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई.
९) निवड फाईल, पोल-७.